पुढारी



आजरा : श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सभासदांचा सत्कार करताना एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. शिवशंकर उपासे, उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड आदी.

# रवळनाथ हौसिंगची कामगिरी कौतुकास्पद : प्रा. उपासे

## आजरा येथे ज्येष्ठ सभासद, यशवंत पाल्यांचा गौरव

**आजरा : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी ही सहकारी तत्त्वावर गृहकर्ज देणारी देशातील एकमेव मल्टिस्टेट संस्था आहे. या संस्थेची गेल्या पंचवीस वर्षांतील कामगिरी देदीप्यमान असून संस्थेची वाटचाल निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. शिवशंकर उपासे यांनी केले.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित अमृतमहोत्सव पूर्ण केलेले सभासद, विविध शासकीय, निमशासकीय खात्यांतून निवृत्त झालेले सभासद आणि सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

चौगुले म्हणाले, आजरेकरांचे प्रेम, सहकार्य व पाठबळ यामुळे संस्थेची चौफेर प्रगती झाली आहे. संस्थेने स्थापनेपासून सामाजिक बांधिलकी जोपासल्यामुळे समाजातील सर्व घटकांची संस्थेशी नाळ घट्टपणे जोडली आहे. आजरा शाखाध्यक्ष प्रा. डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत केले. संचालिका मीना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले. आजरा शाखा सल्लागार प्रा. राजीव टोपले यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, संचालिका रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह सर्व संचालक, अधिकारी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : श्री रवळनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे श्रीमती चंदन कारेकर यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी. शेजारी एम. एल. चौगुले, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, विजय हरगुडे आदी.

# 'रवळनाथ'ची चौफेर प्रगती सभासदांमुळेच : डॉ. देशपांडे

**कोल्हापूर, ता. २० :** अभ्यासू आणि सुजाण सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक आणि संचालकांबरोबरच सर्व कर्मचाऱ्यांच्या बळावरच श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीने चौफेर प्रगती केली आहे, असे मत संस्थेचे शाखा सल्लागार प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे यांनी व्यक्त केले. शहर आणि परिसरातील पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांबरोबरच विविध परीक्षांत यश मिळविलेल्या सभासदांच्या पाल्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेच्या येथील शाखेत हा कार्यक्रम झाला.

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, ''ठेवी, कर्जवाटप एवढ्यावरच न थांबता सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठीही संस्थेने नेहमीच विविध उपक्रमांवर भर दिला. सभासदांच्या सर्व कुटुंबीयांना संस्थेचा कारभार समजावा, हाच त्यामागील उद्देश आहे. त्यामुळे संस्थेचा परिवार अधिक मोठा झाला.''

सत्कारमूर्ती रमेश मिरजकर, उज्ज्वल मुझुमदार, मच्छिंद्र थिटे, परशुराम माळी आदींनी मनोगते व्यक्त केली. यावेळी शाखा सल्लागार आर. एस. पाटील, प्रा. डॉ. रवींद्र पोर्लेकर, भास्कर सांगावकर, अमृत सुतार, सुभाष चव्हाण, मारुती कुंभार, अशोक ओतारी, श्रीमती चंदन कारेकर, अरुण देशपांडे आदी उपस्थित होते. शाखा अध्यक्ष विजय हरगुडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सल्लादार प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अण्णासाहेब कलगोंडा यांनी आभार मानले.

सकाळ

# 'रवळनाथ'मुळे घरांची अडचण दूर

## प्राचार्य डॉ. कोथळे : सभासद, यशवंत पाल्यांचा गौरव

निपाणी, ता. २२ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या सहज, सुलभ व कमी व्याजदरातील अर्थसहाय्यामुळेच सीमाभागातील रहिवाशांची घरबांधणीची अडचण दूर झाली, असे मत प्राचार्य डॉ. एम. बी. कोथळे यांनी व्यक्त केले. श्री रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे आयोजित वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या आणि विविध शासकीय, निमशासकीय सेवेतून निवृत्त सभासदांचा सत्कार व सभासदांच्या पाल्यांचा गौरव अशा संयुक्त समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.




**निपाणी : प्राचार्य हेरेकर यांचा सत्कार करताना प्राचार्य कोथळे. शेजारी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालिका मीना रिंगणे, रेखा पोतदार आदी.**

याप्रसंगी एम. एल. चौगुले म्हणाले, 'दीनदुबळ्या, गरजवंताच्या मदतीला धावून जाण्यामुळे रवळनाथची वेगळी ओळख आहे.'

निपाणी शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर यांचा प्राचार्य डॉ. एम. बी. कोथळे यांच्या हस्ते सत्कार झाला. पंच्याहत्तरी पूर्ण झालेले सत्कारमूर्ती सभासद प्रेमा जनवाडे, निवृत्त प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास संचालिका मीना रिंगणे, रेखा पोतदार, सल्लागार प्रा. डॉ. शिवाजी होडगे, रश्मी व्हदडी, परगोंडा पाटील, आण्णाप्पा मलगत्ते, अशोक मोरे, उपप्राचार्या कांचन पाटील, साक्षी चव्हाण, शाखाधिकारी किरण शहा, अकौंटंट के. टी. पाटील व कर्मचारी उपस्थित होते. सल्लागार प्रा. प्रविणसिंह शिलेदार यांनी सूत्रसंचालन केले. सल्लागार बी. आर. पाटील यांनी आभार मानले.

Belgaum, Nipani-Today
23/09/2021 Page No. 4

तरुण भारत बुधवार, २२ सप्टेंबर २०२१

# ठेवीदारांचा विश्वास, विनम्र सेवेमुळेच संस्थेचा पाया भक्कम

## रवळनाथचे संस्थापक संचालक डॉ. शिवशंकर उपासे यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
आजरा

रवळनाथचे संस्थापक एम. एल. चौगुले यांची दूरदृष्टी, सभासद ठेवीदारांचा विश्वास आणि पारदर्शक कारभार व विनम्र सेवा यामुळेच संस्थेचा पाया भक्कम असून ९ शाखा ८५० सभासद आणि २५ वर्षात अडीच हजार घरांची उभारणी, ३२५ कोटींच्या ठेवी अशी संस्थेची यशस्वी वाटचाल सर्वांना अभिमान वाटावी अशीच असल्याचे प्रतिपादन रवळनाथचे संस्थापक संचालक आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शिवशंकर उपासे यांनी व्यक्त केले. वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या सभासद, विविध शासकीय, निमशासकीय खात्याच्या सेवेतून निवृत्त झालेले सभासद आणि सभासदांच्या गुणवंत पाल्यांच्या सत्कार सभारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

स्वागत आजरा शाखाध्यक्ष प्रा. विनायक आजगेकर यांनी केले. यावेळी बोलताना उपासे म्हणाले, आजऱ्याचे ग्रामदैवत व श्रद्धास्थान रवळनाथाच्या नावाने सुरू केलेली रवळनाथ को. ऑप. हौसिंग सोसायटी ही सहकारी तत्वावर गृहकर्ज देणारी देशातील एकमेव मल्टी–स्टेट संस्था आहे. या संस्थेच्या २५ वर्षातील दैदिप्यमान कामगिरीमुळेच आजऱ्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचले असल्याचे त्यांनी सांगितले.



**आजरा : सभासद यमुताई शेलार यांचा सत्कार करताना संचालिका रेखा पोतदार यावेळी उपस्थित संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, प्रा. शिवशंकर उपासे, उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव आदी.**

अध्यक्षीय मनोगतात चौगुले म्हणाले, आजरेकरांचे प्रेम, सहकार्य, पाठबळ यामुळेच रवळनाथची चौफेर प्रगती झाली आहे. स्थापनेपासून सामाजिक बांधिलकी जोपासल्यामुळे समाजातील सर्व घटकांशी संस्थेची घट्टपणे नाळ जुळली असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर सभासद मनोहर बापट, भगवान पवार, मनोहर पाटील, मरियान वेग, यशवंत पाल्य, चिन्मयी टोपले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष वासुदेव मायदेव, संचालिका रेखा पोतदार, सी.ई.ओ डी. के. मायदेव, अपर्णा उपासे, रत्नाकर देशपांडे, पांडूरंग सुतार, रवींद्र करंबळे, अरविंद पाटील, चंद्रकांत करवळकर, रोहन कोंडूसकर, संस्थेचे जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, शाखाधिकारी उत्तम दळवी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. संचालिका मीना रिंगणे यांनी सूत्रसंचलन केले तर आजरा शाखा सल्लागार प्रा. राजीव टोपले यांनी आभार मानले.